www.rajdand.com
सातारा शनिवार
२. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

मुंबई : राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्याकर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. याबाबत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी घोषणा केली. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.- ऊतएठढखडएचएछढहा निर्णय लाखोकर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्यादृष्टीनेही हितकारक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी म्हटले आहे.मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा

करुन सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तत्वे निश्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे. समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.याचबरोबर, वयोमानानुसार निवृत्ती स्वीकारावी लागते. त्यामुळे निवृत्तीवेतन हाच अनेकांसाठी जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच सुरवातीपासूनच आम्ही या विषयावर सुरवातीपासून संवेदनशील राहीलो आहोत. निवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व मान्य केलंय. याविषयावर आम्ही राज्यसरकारीकर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांशी वारंवार संवाद-संपर्कात होतो. ज्या-ज्यावेळी या संघटनांनी या विषयावर चर्चेची, बोलण्याची मागणी केली. त्या-त्यावेळी आम्ही त्यांना वेळ दिला. समितीच्या अहवालावरही बैठका घेण्यात आल्या. मंत्रिमंडळातील सहकारी, कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीशी, तज्ज्ञांशीही चर्चा केली आहे. यात उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विद्यमान वित्तमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक सूचना केल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.दरम्यान, मध्यंतरी केंद्राप्रमाणेच राज्यातील ८० वर्षे पूर्ण झालेल्या निवृत्तीवेतन धारकांना वाढीव निवृत्तीवेतन देण्याची मागणी तसेच २००५ मध्ये भरतीची जाहिराती निघाल्या, पण भरती प्रक्रीया पूर्ण झाली नसल्याने कालांतराने सेवेत दाखल झालेल्यांना जूनी निवृत्तवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन व राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीबाबत शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. तसेच केंद्र शासनाप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०१५ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात राज्यामध्ये राज्यसरकारीकर्मचारी तसेच राज्य स्वायत्त संस्थेतील कर्मचारी यांची संख्या १३ लाख ४५ हजार इतकी असून यामध्ये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असणारे कर्मचारी ८ लाख २७ हजार इतके आहेत. त्यावर शासनामार्फत जुन्या निवृत्तीवेतन योजनेवर ५२ हजार ६८९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाचा हिस्सा हा ७ हजार ६८६ कोटी रुपये इतका आहे. याशिवाय एकूण वेतनावरील खर्च १ लाख २७हजार ५४४ कोटी इतका आहे.तुलनात्मक अभ्यास समितीविषयी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करणारी समिती १४ मार्च २०२३ रोजी स्थापन केली गेली होती. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबत ही समिती शिफारसी- अहवाल सादर करणार होती.

घरकाम करणाऱ्या हजारो महिला कामगारांचे आझाद मैदानात आंदोलन

मुंबई : घरकाम करणाऱ्या महिलांच्या श्रमाचा योग्य सन्मान, समान वेतनाचा हक्क, आरोग्य विम्याचे अधिकार, मॅटरर्निटीबेनिफिट ग्रॅज्युटी अशा विविध मागण्यांसाठी राज्यभरातून आलेल्या घर कामगार महिलांनी महाराष्ट्र राज्य घरेलु कामगार समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी आझाद मैदानात आंदोलन केले. यावेळी हजारोच्या संख्येने घरेलु महिला कामगार सहभागी झाला होता.

राज्यभरात कोट्यवधी नागरिकाच्या कुटुंबात घर कामगार महिला आपली सेवा देत आहेत. मात्र, वाढत्या महागाईत त्याचे प्रश्न अधिकच प्रखरहोत आहेत. अशात शासनाकडून त्यांच्या मागण्या पूर्ण होत नसल्याने संतप्त महिलांनी शुक्रवारी आझाद मैदानात जोरदार आंदोलन केले. घरेलु महिला कामगारांच्या मागण्या मान्य न झाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराराज्य घरेलु कामगार समन्वय समितीचे निमंत्रक ज्ञानेश पाटील यांनी दिला आहे.

समीर वानखेडे यांना २७ मार्चपर्यंत दिलासा

मुंबई : कॉर्डेलिया क्रूझ ड्रग्जप्रकरणी २५ कोटींची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून ईडीने नोंदवलेला 'ईसीआयआर' रद्द करावा, या मागणीसाठी उच्च न्यायालयात धाव घेतलेल्या एनसीबी मुंबईचे माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांना कारवाईपासून मिळालेला दिलासा न्यायालयाने कायम ठेवला आहे.

याप्रकरणी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी तपास यंत्रणांनी खंडपीठाकडे वेळ मागितला आहे. २७ मार्चपर्यंत कोणतीही कारवाई करणार नाही, अशी हमी (ता. १) न्यायालयात दिली.

साखर कारखान्यांच्या १३७८ कोटींच्या कर्जाची फेररचना; ६९१ कोटींचे अतिरिक्त व्याज माफ

पुणे: केंद्र सरकारने देशभरातील ३३ सहकारी साखर कारखान्यांच्या १ हजार ३७८ कोटी रुपयांच्या थकीत कर्जाची पुनर्बांधणी करण्यास मान्यता दिली असून यातील ६१९ कोटी रुपयांचे अतिरिक्त व्यात पूर्ण माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने याबाबत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यामुळे साखर कारखान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली. यात राज्यातील २० कारखान्यांची थकीत कर्जाची रक्कम ८६१ कोटी रुपये इतकी आहे.

ाज्य व केंद्रसरकारकडूनमिळालेले कर्ज वेळेत न फेडू शकल्याने कारखान्यांना त्यावरील व्याज व अतिरिक्त व्याज अशी एकूण १ हजार ३७८ कोटी रुपयांची रक्कम देणे अपेक्षित होते. एकूण थकीत कर्जांपैकी ५६६.८३ कोटी रुपये मुद्दल असून त्यावरील थकीत व्याज १९१.७९ कोटी रुपये आणि अतिरिक्त व्याज ६१९.४३ कोटी रुपये होते. एकूण थकीत कर्जामध्ये महाराष्ट्रातील कारखान्यांचे ८६१.२३ कोटी रुपये, उत्तर प्रदेशातील २०२.४८ कोटी रुपये, तमिळनाडूतील ११३.१५ कोटी रुपये, कर्नाटकमधील १०३.२० कोटी रुपये, गुजरातमधील ३९.३७ कोटी रुपये व उर्वरित रकमेत आंध्र प्रदेश, ओडिशासह अन्य राज्यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने २८ फेब्रुवारी घेतलेल्या या निर्णयानुसार थकीत कर्जावरील अतिरिक्त व्याज पूर्णपणे माफ केले असून थकलेले मुद्दल आणि त्यावरील व्याजाच्या रकमेची सात वर्षात पुनर्बांधणी करण्यात आली आहे.

BEST ही सामान्य माणसाच्या दळणवळणाची व्यवस्था, दर वाढीला स्थगिती द्या : आशिष शेलार

मुंबई : : मार्च महिन्याच्या पहिल्याच दिवशी मुंबईकरांच्या खिशाला झळ बसली. मुंबईची दुसरी लाईफ लाईन असलेल्या 'बेस्ट'चा प्रवास महागला. बेस्ट बसच्या भाड्यात वाढ करण्यात आली असून पाससाठी नवे दर लागू करण्यात आले आहेत. १ मार्चपासून बेस्टच्या दैनंदिन पासच्या दरात १० रुपये तर मासिक पासच्या दरात १५० रुपयांनी वाढ लागू करण्यात आली आहे. याच मुद्द्यावर आज, बेस्टच्या दर वाढीला स्थगिती द्या, अशी मागणी भाजपाचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी केली.

बेस्टच्या मासिक पासात करण्यात आलेली दर वाढ ही अवाजवी असून तीला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. याबाबत औचित्याचा मुद्दा मांडताना

आमदार शेलार म्हणाले की, बेस्टच्या मासिक व विकली पासच्या दरात आजपासून वाढ करण्याचा निर्णय झाला आहे. मुंबईतील सामान्य माणसाची दळणवळणाची व्यवस्था ही बेस्टची बस आहे. ३५ लाख प्रवासी त्यात प्रवास करतात. गेल्या वर्षात सात ते आठ लाख प्रवासी वाढले. कामावर जाणारी माणसे, शाळकरी मुले त्यातून प्रवास करतात. त्यामुळे बेस्टच्या मासिक पासमध्ये ८७ टक्क्यांनी तर विकली पासमध्ये १७ टक्क्यांनी झालेली वाढ अन्यायकारक आहे. त्याला स्थगिती द्यावी अशी विनंती त्यांनी सभागृहात केली.

पासाच्या दरात वाढ, तिकीटांचे दर 'जैसे थे'

बेस्टने पासच्या दरात वाढ केल्याने आजपासून खर्चात भर पडणार आहे, मात्र बेस्टच्या तिकीट दरात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. फक्त दैनंदिन पास आणि मासिक पासच्या दरात वाढ झाली आहे, असे बेस्ट प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या दरम्यान, बेस्टने विद्यार्थ्यांसाठीची सवलत कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांसाठी २०० रुपयांच्या मासिक पासमध्ये अमर्याद बस फेऱ्यांची सुविधा कायम ठेवण्यात आली आहे. बेस्टच्या नव्याने लागू करण्यात आलेल्या दरानुसार, ४२ ऐवजी आता १८ पास असतील. यामध्ये ६ रुपये, १३ रुपये, १९ रुपये आणि २५ रुपये वातानुकूलित आणि विनावातानुकूलित बस प्रवास भाड्यासाठी साप्ताहिक आणि मासिक पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तर आम्ही भाजपा : आरएसएसबरोबर जाऊ शकतो, प्रकाश आंबेडकरांचं मोठं वक्तव्य

पुणे: प्रकाश आंबेडकरांचा वंचित बहुजन आघाडी हा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी झाला असला तरी अद्याप मविआकडून वंचितला योग्य वागणूक मिळाली नसल्याची तक्रार वंचितच्या नेत्यांनी केली आहे. महाविकास आघाडीत अद्याप जागावाटप झालेलं नाही. चारही पक्षांमध्ये वेगवेगळ्या मतदारसंघांसाठी रस्सीखेच चालू आहे. जागावाटपासाठी नुसत्या चर्चा चालू असून मविआ नेते अद्याप त्यातून कुठलाही निष्कर्ष काढू शकले नाहीत, अशी तक्रार करत प्रकाश आंबेडकर यांनी मविआ नेत्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूला भाजपाही प्रकाश आंबेडकर यांनी महायुतीत यावं यासाठी प्रयत्न करत आहे.

वंचित बहुजन आघाडी ही महाविकास आघाडीबरोबर राहील की नाही याबाबत अनेकजण साशंक असतानाच वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, आम्ही सुधारणांमध्ये विश्वास ठेवतो. समाज सुधारणं ही आमची प्राथमिकता आहे. राजकीय पक्ष म्हणून काम करत असताना आमचे काही राजकीय अजेंडे असले तरी आमच्यासाठी सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाची आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, सामाजिक सुधारणा करता करता जर आम्हाला सत्ता मिळाली तर आम्ही निश्चितपणे त्या सत्तेचा स्वीकार करू. आत्ता आपल्या देशात पौरोहित्य आणि धार्मिक विधींच्या अधिकारांबाबत मोठ्या सुधारणा होणं आवश्यक आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी नागपूर येथे टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी त्यांनी वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय जनता पार्टीबरोबरच्या संभाव्य युती-आघाडीवर भाष्य केलं.

आमचा जातीवर आधारित पुरोहितशाहीला विरोध

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आपल्या देशात जे पुजारी, पुरोहित किंवा धार्मिक विधी करणारी जी मंडळी आहे, ती जातीच्या आधारावर आहे. म्हणजेच आज कुंभाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता, लोहाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता मर्यादित आहे. त्या-त्या पुरोहितांना त्यांच्या त्यांच्या समाजापुरती मान्यता आहे. त्याला इतर समाजात मान्यता नाही. त्यामुळे समाजात समता आणि अधिकार दोन्ही आणायचे असतील तर या क्षेत्रात सुधारणा होणं आवश्यक आहे. कारण हे खूप प्रतीकात्मक आहे.वंचितचे प्रमुख म्हणाले, आम्हाला असं वाटतं की, देशात जी जातीवर आधारित पुरोहितशाही चालली आहे ती कायद्याने पूर्णपणे बंद करायला हवी. यावर सरकारने बंदी घालायला हवी. त्यासाठी हिंदू स्कूल ऑफ थिओलॉजी (ब्रह्मज्ञान) उभं केलं जावं आणि तिथून शिकून, उत्तीर्ण होऊन जो पुरोहित बाहेर पडेल, जो पुजारी बाहेर पडेल त्यालाच या देशात धार्मिक विधी करण्याचा अधिकार असला पाहिजे. धार्मिक विधी त्याच्यामार्फतच केले जायला हवेत. आरएसएस आणि भाजपा जर असा कायदा आणि सुधारणा आणण्यास तयार असेल तर आम्ही त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार करू शकतो.

उद्धव ठाकरेंना भाजपाची ऑफर? देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यादिवशी ते....

मुंबई : महाविकास आघाडी स्थापन करुन उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री होणं हा भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे अशी टीका आत्तापर्यंत देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसंच २०२२ मध्ये जेव्हा उद्धव ठाकरेंना राजीनामा द्यावा लागला आणि राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आलं तेव्हाही मी बदला घेतला असं देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. आता संजय राऊत यांनी उद्धव ठाकरेंना भाजपा पुन्हा ऑफर देते आहे असा दावा केला. या दाव्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीत असंही म्हटलं आहे की भाजपा पक्ष फोडते असं तुम्ही का म्हणता? ज्या लोकांची पक्षात घुसमट होते, जीव गुदमरतो त्यांना वाटतं की विकासासाठी आम्ही भाजपासह गेलं पाहिजे. अशावेळी जर बडा नेता भाजपात येत असेल आणि आमची ताकद वाढत असेल तर आम्ही त्यांना नाही कसं म्हणणार? अशोक चव्हाण भाजपात आले आहेत. नांदेडमधला इतका मोठा नेता भाजपात येतो आहे, मोदींचं नेतृत्व स्वीकारतो तर नाही कसं म्हणणार? बरं ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्यातून त्यांचं त्यांनी सुटायचं आहे. अशोक चव्हाण एक खटला हायकोर्टात जिंकले आहेत. आता सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

संजय राऊत असं म्हणाले की दिल्लीतले भाजपाचे काही नेते म्हणत आहेत की उद्धव ठाकरेंनी आमच्याबरोबर यावं आपण एकत्र येऊ आमची चूक झाली. याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, संजय राऊत अजूनही बेशुद्धच आहेत का? संजय राऊत यांना अशी स्वप्नं पडत असतील तर आश्चर्यच आहे. दुसरं असं की आमच्याकडे दिल्लीत असे काही नेते नाहीत जे जाळं घेऊन कुणाच्या मागे जातात. महाराष्ट्राचा काही विषय असेल तर मला विचारलं जातं. मला कुणीही विचारलेलं नाही. उद्धव ठाकरेंवर जाळं टाकायचं का? हे मला कुणीही विचारलेलं नाही. अशा प्रकारचं जाळं टाकण्यात आलं आहे हे स्वप्न जरी संजय राऊत यांना पडलं असलं तरीही मला ती वस्तुस्थिती वाटत नाही.

उद्धव ठाकरेंवरचा विश्वास उडाला आहे

संजय राऊत असंही म्हणाले की आता उद्धव ठाकरे जर भाजपासह गेले तर ठाकरे कुटुंबावरचा विश्वास उडेल, असं ते म्हणाले, याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्या दिवशी महाविकास आघाडीसह जाण्याचा निर्णय उद्धव ठाकरेंनी घेतला त्यादिवशीच लोकांचा विश्वास उडाला. बाळासाहेब ठाकरेंवर जो विश्वास जनतेने टाकला होता तोच विश्वास जनतेने उद्धव ठाकरेंवर टाकला होता. ते महाविकास आघाडी बरोबर गेले तेव्हा ठाकरेंवरचा विश्वास कमी झाला आहे. आता काय बाकी आहे? संजय राऊत जे बोलले ते घडून गेलं आहे. आता उद्धव ठाकरेंची विश्वासार्हता कमी झाली आहे.

ी असंही म्हटलं होतं की मतभेद संपवता येतात, पण मनभेद संपवणं कठीण असतं. ज्या प्रकारे उद्धव ठाकरे मोदींवर टीका केली आहे, जे शब्द वापरले आहेत, जे आमच्याशी वागले आहेत. त्यांचं सरकार असताना माझ्यासही सगळ्यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे मनभेद झाले आहेत. आता त्यांना बरोबर घेणं शक्य नाही. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

यंदाचा उन्हाळा अधिक तापदायक ठरणार

उष्णतेची लाट येण्याची शक्यता, हवामान विभागाचा अंदाज

पुणे : गेल्या वर्षी हवामान बदलाचा फटका भारताला चांगला बसला आहे. त्यात यंदा देखील भर पडणार आहे. यावर्षीचा उन्हाळा अधिक तापदायक राहील, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या वतीने आज देण्यात आला. मार्च ते मे महिन्यातील हवामान कसे असेल, याची माहिती 'आयएमडी'ने जारी केली आहे.

दरवर्षी मार्च महिना सुरू झाला की, 'आयएमडी' आपला तीन महिन्यांच्या हवामानाचा अंदाज जारी करते. यावर्षी देशातील बहुतांश भागातील सरासरी तापमान अधिक राहणार असून, केवळ उत्तर-पश्चिम, उत्तर-पूर्व भागात सरासरी तापमान असणार आहे. हिमालयातील तापमान नेहमीप्रमाणे असेल. मार्च ते मे २०२४ या उन्हाळ्याच्या हंगामात महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. तसेच महाराष्ट्रात देखील अधिक तापमान असेल आणि उष्णतेची लाट येईल, असा अंदाजही वर्तविण्यात आला आहे.

महाराष्ट्रातही मार्चमध्ये अधिक पाऊस

महाराष्ट्रासह देशातील बहुतेक भागांमध्ये मार्च महिन्यात होणाऱ्या पावसाचे प्रमाण देखील सरासरीपेक्षा अधिक राहणार आहे. देशातील मार्च महिन्यातील पावसाचा 'लॉग पिरियड व्हरेज' म्हणजे एलपीए हा साधारणपणे २९.९ मिमी राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ही आकडेवारी १९७१ ते २०२० च्या एकूण नोंदीवरून काढण्यात आली आहे.

मानवता हाच खरा धर्म : चर्मकार हा सामाजिक ऐक्य जोपासणारा समाज : आ. दिपकराव चव्हाण

फलटण : मानवता हाच खरा धर्म असून, सामाजिक ऐक्य जोपासणाऱ्या चर्मकार समाजाने आपल्या बांधवाना मदतीचा हात देऊन एकमेकांच्या प्रगतीसाठी साथ करावी असे आवाहन फलटण - कोरेगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

श्री संत रोहिदास महाराज यांच्या ६४७ व्या जयंतीनिमित्त फलटण येथे आयोजित कार्यक्रमात आ. चव्हाण बोलत होते, यावेळी श्री सेवागिरी देवस्थानचे मठाधिपती प.पू. महंत सुंदरगिरी महाराज, माजी नगरसेविका सौ. प्रगतीताई कापसे, पंचायत समिती माजी सदस्य सचिन रणवरे, पत्रकार यशवंत खलाटे पाटील, संतोष चव्हाण, गणपतराव भोसले, ज्ञानेश्वर भगत, शशिकांत भोसले यांच्यासह अन्य मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

देवाने जीवसृष्टी तयार करताना, मानव प्राण्याचीही निर्मिती केली, मानवाला बुद्धी, भावना व्यक्त करण्यासाठी भाषा दिली, मात्र इतर प्राण्यांना हे दिले नाही, पुढे माणूस समूहाने

एकत्र राहु लागला, आणि त्या त्या प्रदेशानुसार माणसाचे नियम वेगवेगळे झाले, मग हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन असे धर्म सोयीसाठी बनले, सर्व धर्म चांगलेच आहेत, कोणताच धर्म दुसऱ्या धर्माविषयी चुकीचा विचार सांगत नाही, पण तरीही नेहमी दोन धर्मांमध्ये भांडण/वाद होतात या पार्श्वभूमीवर मानवता हाच खरा धर्म असून सर्व संतांनी सुद्धा मानवता धर्माचाच पुरस्कार केला असल्याचे निदर्शनास आणून देत, माणुसकीचे वर्तन म्हणजेच मानवता धर्म असून जे मला हवे ते दुसऱ्यालाही देणे म्हणजेच खरी माणुसकी असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

श्री संत रोहिदास महाराज यांचे विचार आपण सर्वांनी आत्मसात करुन समाजातील गरजू गरिबांना खरी मदत केली पाहिजे व त्या गरीब लोकांना खऱ्या अर्थाने प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी तन, मन, धनाने पुढे आले पाहिजे तर खरी मानवतेची भावना निर्माण होईल व समाज खऱ्या अर्थाने सक्षम होईल, संत गाडगे बाबांनी भुकेलेल्यांना अन्न दिले, तहानलेल्यांना पाणी पाजले, रोग्यांची सेवा केली, धर्मशाळा बांधल्या, सावित्रीबाई फुले, महात्मा फुलेंनी शाळा काढली हे खरे मानवता धर्माचे पाईक आहेत. आपणही आपल्या आयुष्यात दुसऱ्यांच्या सुखासाठी, आनंदासाठी, हितासाठी काही करु शकत असू तर आपणही मानवता धर्माच पाईक होऊ अशी भावना आ. दिपकराव चव्हाण यांनी व्यक्त केली.

मिरज जि. सांगली येथील उद्योजक तानाजी सातपुते यांना आ. दिपकराव चव्हाण, मठाधिपती प.पू. महंत सुंदरगिरी महाराज यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कोणत्याही धर्माने फक्त आपलाच धर्म श्रेष्ठ आहे आणि दुसऱ्यांचा नाही ही भावना कधीही व्यक्त केली नसल्याचे स्पष्ट करताना सर्वात महत्त्वाचा धर्म म्हणजे मानवता धर्म असून एकमेकांवर प्रेम, आपुलकी, एकमेकांना मदत करणे, प्रत्येका विषयी सहानुभूती ठेवणे, आदर मनात बाळगणे, समोरच्याला कधीही तुच्छ न लेखणे, तो गरीब असो की श्रीमंत असो, कोणत्याही वर्णाचा असो, कुठल्याही जाती धर्मातून आलेला असो, आपल्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आपुलकी व सहानुभूती बाळगणे हाच खरा मानवता धर्म असे स्पष्ट प्रतिपादन आ. दिपकराव चव्हाण यांनी केले.

चर्मकार समाजाने स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली असून कुठेही वाद किंवा इतर गोष्टीपासून दूर असतो, त्यामुळे चर्मकार समाजाकडे पाहण्याचा सर्वांचाच दृष्टिकोन अतिशय चांगला असून एकमेकांची मदत करुन सर्वांना बरोबर घेऊन समाजाला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आ. चव्हाण यांनी समाज बांधवांना केले.

प्रा. अरुण खरात यांनी प्रारंभी सर्व उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर प्रास्ताविकात कार्यक्रमाविषयी माहिती दिली, समाज संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला, प्राचार्य विठ्ठल हंकारे यांनी सूत्रसंचालन, सागर भोईटे यांनी समारोप व आभार प्रदर्शन केले.

यावेळी अध्यक्ष भोलेनाथ भोईटे, हृदयनाथ भोईटे, डॉ. रोहिदास साळे, संतोष पोटफोडे, गणेश भोईटे, तुकाराम भोईटे, संतोष दगडे, संतोष भोईटे, संतोष कांबळे, रोहिदास पवार यांच्यासह समर्थ प्रतिष्ठानचे पदाधिकारी व चर्मकार बांधव भगिनी व जेष्ठ मार्गदर्शक तसेच तरुण तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एनएमएस परीक्षेत पाटणच्या साळुंखे विद्यालयाची उत्तुंग भरारी

पाटण: : महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत २४ डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (एन.एम.एम.एस) शिष्यवृत्ती.परीक्षेत कै ज्ञानोजीराव साळुंखे विद्यालयातील एकूण ७७ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व शेकडा निकाल ९४.८०% येवढा लागला आहे. २३ विद्यार्थ्यांनी १०० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. व सारथी शिष्यवृत्ती साठी ४६ विद्यार्थी पात्र झाले.

कु.अनुश्री आनंदा टोळे ही १३९ गुण प्राप्त करून प्रथम आली आहे. एनएमएस टीम चे प्रमुख श्री पवार एस.एस. (सर)यांचे उत्कृष्ठ नियोजन व सहकारी श्री पाटील आर .सी (सर),सौ बोंभल(मॅडम),सौ. रावळ(मॅडम)यांचे कठिण परिश्रमा मुळे तळागाळातील कुटंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लावण्याचे काम झाले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.देसाई ए.ए. प्र.उपमुख्याध्यापक श्री देसाई बी.पी.,प्र पर्यवेक्षक श्री शेवाळे एस.टी. यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थीच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे

शुभांगीताई गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे ,सहसचिव (प्रशासन) विद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेजवळ प्राचार्य गवळी, श्रीराम साळुंखे

तसेच स्थानिक सल्लागार समिती ,शिक्षक पालक संघ,माता पालक संघाचे अद्यक्ष,उपाध्यक्ष सर्व सदस्य तसेच पालक वर्ग ग्रामस्थ सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

उरुसानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबीर

पाटण : सर्व धर्मियांचे श्रद्धा स्थान असलेल्या पाटण येथील दर्ग्याच्या उरुसानिमित्त पुणेवाले चिश्ती परिवाराने भव्य मोफत आरोग्य शिबीर शुक्रवार दि. १ मार्च रोजी आयोजित केले आहे. याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन पीर हजरत शेख मोहम्मद खलील चिश्ती यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, खानका हजरत ख्वाजा गरीब नवाज बंदानवाज गेसूदराज व एच व्ही देसाई आय सेंटर, कृष्णा विश्व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानाने पाटण रामापूर याठिकाणी आरोग्य शिबीर, सर्व रोग निदान व तपासणी शिबीर आयोजित केले आहे.

शिबीरामध्ये, नेत्र तपासणी मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया व चष्मे वाटप करण्यात येणार आहे. जनरल तपासणी, कान नाक घसा तपासणी, स्त्रीरोग व वंध्यत्व, लहान मुलांची तपासणी, अस्थिरोग, मानसोपचार, दंत तपासणी, हृदय तपासणी(ईसीजी) या तपासण्या होणार आहेत.

शिबीर शुक्रवार दि. १ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत असणार आहे. शिबीराचे ठिकाण सातारा जिल्हा बँक रामापूर मागे, जि. प. शाळा रामापूर शेजारी, रामापूर पाटण. जास्तीत जास्त लोकांनी याचा लाभ घ्यावा तसेच नावनोंदणी करावी असे आवाहन पीर हजरत शेख मोहम्मद खलील चिश्ती(पुणेवाले) यांनी केले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंगळवारी अकोल्यात

अकोला: आगामी एप्रिल महिन्यात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने संचलन समिती गठीत केली आहे. या समितीकडून लोकसभा मतदार संघ निहाय कामकाजाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रीअमित शाहयांचे ५ मार्च मंगळवार रोजी सकाळी १०.३० वाजता अकोला शहरात आगमन होत आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने राज्यात पाच लोकसभा मतदार संघ मिळून एक 'क्लस्टर'तयार केले आहे. निवडणुकीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी केंद्रीय निवडणूक समितीच्या निर्देशानुसार संचलन समिती गठीत केली आहे. या समितीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले पक्षातील मुख्य पदाधिकारी, विविध आघाडी व सेलच्या प्रमुखांना कामाच्या स्वरुपानुसार जबाबदारी देण्यात आली आहे. लोकसभा मतदार संघातील राजकीय समिकरणांचा आढावा घेऊन रणनिती आखण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रीअमित शाह ५ मार्च रोजी अकोल्यात दाखल होत आहेत. रिधोरा नजिक असलेल्या एका प्रशस्त हॉटेलमध्ये ते आढावा घेतील. दुपारी १.०० वाजता बैठक आटोपून ते जळगावकडे रवाना होणार असल्याची प्राथमिक माहिती आहे.

इचलकरंजी पाणी योजनेसाठी तज्ज्ञ समितीची स्थापना

मुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश, निर्णयावर टीका आणि स्वागत

कोल्हापूर : इचलकरंजी महापालिकेच्या सुळकूड उद्भव दुधगंगा नदी पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासंदर्भात तज्ञांची समिती नेमून एक महिन्यात अहवाल देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी मुंबई येथील बैठकीत दिले.

इचलकरंजी दुधगंगा पाणी योजना मंजूरीपासूनच ही योजना वादाच्या भोवर्यात अडकली आहे. कागल व शिरोळ तालुक्यासह दुधगंगा नदीकाठावरून विरोध होत आहे. दोन्ही बाजूंनी आंदोलने छेडली जात असल्याने मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, आमदार प्रकाश आवाडे, आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, जिल्हाधिकारी अमोल येडगे, इचलकरंजीचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, माजी नगराध्यक्षा अलका स्वामी,

बैठकीवेळी माजी पाणी पुरवठा सभापती विठ्ठल चोपडे, राहुल आवाडे, अशोक स्वामी, सागर चाळके, प्रताप होगाडे, मदन कारंडे, रवींद्र माने, संजय कांबळे, तानाजी पोवार, प्रताप होगाडे, अभिजित पटवा, रवी रजपुते, सुरेशदादा पाटील, सयाजी चव्हाण, राहुल खंजिरे, अमित गाताडे, पुंडलिक जाधव, मनोज साळुंखे, महापालिका जल अभियंता सुभाष देशपांडे, नागेंद्र मुतखेकर, बाजीराव कांबळे, जंबा शिंदे आदी उपस्थित होते.

समितीची कार्यकक्षा

मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रश्नी मध्यममार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी, कृती समितीचे प्रतिनिधी, जलसंपदा, जीवन प्राधिकरण, महानगपालिकेचे अधिकारी, तांत्रिक तज्ज्ञांचा समावेश असणाऱ्या समितीने तांत्रिक अभ्यास करून एक महिन्यात अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले. चर्चेदरम्यान अन्य पर्यायामधून पाणी इचलकरंजीला देता येईल काय? याबाबत देखील या समितीने अभ्यास करावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केला.

समर्थन आणि विरोध

खासदार धैर्यशील माने, माजी आमदार सुरेश हळवणकर यांनी दूधगंगा नदीतून पाणी इचलकरंजी शहराला मिळालेच पाहिजे याबाबत मांडणी केली. खासदार संजय मंडलिक, आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी इचलकरंजी कृष्णा योजनेची बळकटी करुन हवे तेवढे पाणी घ्यावे असे सांगितले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी कृष्णा नदीवरूनच योजना पूर्ण करता येईल काय? याबाबत सर्वांनी सकारात्मक विचार करावा. दूधगंगा स्रोताबाबत वाद असल्यामुळे अन्य पर्यायाचा सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

कृती समितीकडून निषेध

आजचा मुख्यमंत्र्यांचा निर्णय पाहता इचलकरंजीकारांच्या मनात शासनास इचलकरंजीला पाणी द्यायचे आहे की नाही असा प्रश्न निर्माण होत आहे. निव्वळ बैठक घेऊन तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार केला असल्याबाबत इचलकरंजी सुळकुड पाणी योजना कृती समितीच्याने शासनाचा निषेध करीत असल्याचे समितीचे समन्वयक प्रताप होगाडे यांनी म्हटले आहे.

कागलमधून स्वागत

दूधगंगा नदीचे पाणी कमी पडू लागले असताना इचलकरंजीला पर्यायी योजना राबवण्यास सांगून शासनाने योग्य भूमिका घेतली असल्याचे सांगत दूधगंगा बचाव कृती समितीने स्वागत केले आहे.

भागडी येथील जिल्हा परिषद शाळेत मराठी भाषा दिन उत्साहात

वळती : मराठी भाषा दिनानिमित्त भागडी (ता. आंबेगांव)च्या जिल्हा परिषद शाळेत मराठी भाषा दिन वि .वा .शिरवाडकरांच्या प्रतिमेचे पुजन करून मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला . याप्रसंगी इनरव्हिल क्लब मंचरच्या अध्यक्षा डॉ .मेघा गाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले , की विद्यार्थ्यांनी संस्कृती व वाचनाचा छंद व वाचन करून नोंदी ठेवाव्यात , साहित्य कलेची आवड निर्माण करावी त्यामुळे जिवनाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही . तसेच त्यांनी कुसुमाग्रजांची कविता

सादर केली . मराठी भाषा दिनाचे औचित्य साधुन डॉ.गाडे यांनी शाळेसाठी पाच व्हाईट बोर्ड प्रदान केले. तसेच भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप केले . डॉ. गाडे यांनी पाचवीच्या होणाऱ्या शिष्यवृत्ती परिक्षेत गुणवत्ता धारक प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले .

डॉ .ज्योती वाघ यांनी विद्यार्थ्यांना आरोग्या विषयी मार्गदर्शन करताना सांगितले की , आरोग्य व घ्यावयाचा चौरस आहार , अभ्यासाचे महत्व व घरातीलच पदार्थ खावेत ,बाहेरील पदार्थ टाळावेत . अभ्यास करून उज्वल यश संपादन करावे व आई - वडीलांचे आज्ञा पालन करावे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक विजय गाडे उपस्थित होते .

मुख्याध्यापक बाळासाहेब गिलबिले म्हणाले , मराठी भाषा गौरवदिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले गेले आहेत. आपल्या मातृभाषेला गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवसाचे महत्व विशद केले .

यावेळी कृतिका आदक ,समिक्षा आगळे ,समिक्षा उंडे यांनी मराठी भाषेविषयी माहिती सांगीतली . तर विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सादर केल्या . कार्यक्रमाचे नियोजन आशा वाळके व लालन गायकवाड यांनी केले सिध्दी रावळ यांनी सुत्रसंचलन तर स्वाती शिंदे यांनी आभार मानले .

कामगार आयुक्त मुबंई येथे ११ मार्चला जनता क्रांती दलाचा ' जवाब दो ' मोर्चा

सुरक्षा रक्षक मंडळात बेकायदेशीर भरती प्रकरण : अधिकाऱ्यांच्या चौकशी ची मागणी

वडूज : सांगली सुरक्षा रक्षक मंडळ तथा सहायक कामगार आयुक्त मुजमलं मुजावर व सातारा सहायक कामगार आयुक्त रे. मु. भिसले यांनी आपल्या पदाचा गैर वापर करून सुरक्षा गार्ड भरती केली असून त्याची चौकशि करून देण्यात आलेल्या नियुक्त्यांना तात्काळ स्थगिती द्यावी या मागणी साठी जनता क्रांती दलाच्यावतीने दि ११ मार्च रोजी मुंबई येथील कामगार आयुक्त कार्यालयावर ' जवाब दो ' मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष सत्यवान कमाने यांनी दिली आहे.

याबाबत त्यांनी कामगार आयुक्त मुंबई यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात दिलेली अधिक माहिती अशी की सन २०१८ ते २१ मध्ये अधिकृत मागणीदवारे सुरक्ष रक्षक गार्ड भरती साठी नोंदणी करण्यात आली. त्यावर समुचचय् पूल तयार केला गेला. व नोंदीकृत असणाऱ्या सुरक्षा गार्ड ची लेखी परीक्षा, मैदानी परीक्षा व आरोग्य तपासणी करून पत्र यादी तयार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीला डावलून २९ डिसेंबर २०२३ रोजी पूल यादीत तसेच नोंदणी नसणाऱ्या लोकांना बेकायदेशीर रित्या सांगली सुरक्षा रक्षक मंडळ तथा सहायक कामगार आयुक्त मुजमलं मुजावर व सातारा सहायक कामगार आयुक्त रे. मु. भिसले यांनी सांगनमत करून सातारा जिल्ह्यात व कवठे महांकाळ येथे आर्थिक उलाढाल करून सुरक्ष रक्षक गार्ड ची भरती केली आहे.

> **सांगली सुरक्षा रक्षक मंडळ तथा सहायक कामगार आयुक्त मुजमलं मुजावर व सातारा सहायक कामगार आयुक्त रे. मु. भिसले यांनी आपल्या पदाचा गैर वापर करून सुरक्षा गार्ड भरती केली असून त्यासाठी चौकशी समिती स्थापन् करण्यात यावी. चौकशी अंती या भरतीत घोटाळा करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. त्याचं बरोबर भरतीस स्थगिती देण्यात यावी.**
>
> **- सत्यवान कमाने**
> **प्रदेशाध्यक्ष - जनता क्रांती दल महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेने २३/५/२०२३ रोजी सातारा जिल्हा सुरक्ष रक्षक मंडळाची स्वतंत्र निर्मिती केली असून सुरक्ष रक्षक सांगली येथून त्याचे विभाजन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार सर्व कागदपत्रे रजिस्टर , आर्थिक व्यवहार, गार्ड नोंदी च्या याद्या, इत्यादी दस्तऐवज सातारा मंडळाकडे हस्तानंतरीत होत असताना घाई गडबडीत बेकायदेशीर नोंदणी कृत नसणाऱ्या लोकांची गार्ड भरती मुजावर व भिसले यांनी केली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

त्याचबरोबर दि १३ फेब्रुवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु होते. त्यानंतर दि २३ फेब्रुवारी रोजी सहायक कामगार आयुक्त कार्यालय सातारा येथे मोर्चा काढण्यात आला होता. यानंतर संबंधित अधिकाऱ्यावर व भरती स्थगितीस कार्यवाही होण्यास टाळाटाळ होत असल्यानंतर अखेर जनता क्रांती दलाच्या वतीने थेट मुंबई येथील कामगार आयुक्त येथे जवाब दो चा मोर्चाचे नियोजन केले आहे.

तर या भरती प्रक्रियेमध्ये खाजगी एजन्सी व दोन्ही ही कामगार आयुक्त यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल केल्याचे ही प्रथम दर्शनी दिसून येत असल्याने त्यांचे मोबाईल चे सी. डी. आर तपसण्यात यावेत. त्यामुळे भरतीत झालेला हा भोंगळ कारभार समोर येईल. पंचायत समिती सातारा सह जिल्ह्यातील इतर ठिकाणी डिसेंबर महिन्यात देण्यात आलेल्या नियुक्त्यांना स्थगिती देऊन २०१८-२१ च्या यादीतील गार्ड ना नियुक्त्या द्याव्यात अशी मागणी निवेदनात केली आहे. तर या मोर्चाला संघटनेतील कार्यकर्तेयांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष विशाल सपकाळ व सांगलीचे दिपक वाघमारे यांनी केली आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीत भाजप करणार धक्का तंत्राचा अवलंब

नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीतही भारतीय जनता पक्षाच्या वतीने धक्का तंत्र अवलंबिले जाणार आहे. पक्षाकडून किमान ६० ते ७० विद्यमान खासदारांचे तिकीट कापले जाणार आहे. अकार्यक्षम खासदारांबरोबरच सलग तीन वेळा निवडून आलेले ज्येष्ठ सदस्य आणि वयोवृद्ध खासदारांनाही उमेदवारी नाकारून नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. पक्षाने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्याची जबाबदारी तिकीट नाकारलेल्या खासदारांवर असणार आहे. भाजपच्या निवडणूक रणनीतीवर जातीय समीकरणांचा ही प्रभाव असून इतर मागास प्रवर्गातील विद्यमान खासदारांचे तिकीट न कापण्याचा पक्षाचा प्रयत्न असणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपची सूत्र हाती घेतल्यापासून धक्का तंत्र हा पक्षाच्या राजकारणाचा अविभाज्य घटक बनला आहे. आगामी निवडणुकीतही जुन्या, जाणत्यांना मार्गदर्शकाची भूमिका देऊन नव्या चेहऱ्यांना राजकारणात संधी देण्याचा पक्षाचा मानस आहे. त्यानुसार आगामी लोकसभेत भाजपच्या वतीने अधिकाधिक नवे चेहरे दिसण्याची शक्यता आहे.

मागील काही वर्षापासून भाजप पक्ष संघटनेच्या वतीने खासदारांच्या कामाचे 'प्रगती पुस्तक' मागविण्यात येत आहे. प्रत्येक खासदाराने आपापल्या मतदारसंघात नेमके काय काय काम केले, याची माहिती पक्ष संघटनेकडून घेतली जात आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक केंद्रीय मंत्र्याला मतदारसंघ वाटून दिली असून त्यांच्याकडून त्या त्या मतदारसंघातील खासदाराच्या कामगिरीचा आढावा घेतला जात आहे. याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातूनही आपल्या पक्षाच्या खासदारांच्या कामाचे मूल्यमापन होत आहे. याशिवाय नमो पवरून आपल्या लोकसभा मतदारसंघातील सर्वाधिक लोकप्रिय तीन भाजप नेत्यांची नावे मागून थेट मतदारांकडून सर्वे क्षण करण्यात आले आहे. या सर्व माहितीचे विश्लेषण करून भाजपच्या वतीने उमेदवारी निश्चित केली जाणार आहे.

भाजपाच्या वतीने प्रत्येक राज्याच्या निवडणूक समितीच्या बैठकीत प्रत्येक मतदारसंघातील संभाव्य उमेदवारांच्या नावांची यादी निश्चित करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी मोदी यांच्यासह अमित शहा, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि संघटन महासचिव बी एल संतोष यांची बैठक पार पडली. या बैठकीत सर्व मतदारसंघाच्या संभाव्य उमेदवारांचा आढावा घेण्यात आला.

भाजपाच्या वतीने प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील निवडून येण्याची सर्वाधिक क्षमता असलेला उमेदवार कोण याची सखोल पाहणी करण्यात आली आहे. हा उमेदवार भाजपाचा नसेल तर त्याला आपल्या पक्षात आणण्यासाठीही कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी पक्षाने राज्य राज्यात स्वतंत्र समिती ही नियुक्त केली आहे.

सुप्रिया सुळेंकडून स्वत:ची उमेदवारी जाहीर ? पोस्टची चर्चा होताच केला खुलासा

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राज्यासह संपूर्ण देशाचं लक्ष बारामती लोकसभा मतदारसंघाकडे लागलं आहे. कारण राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर पवार कुटुंबातही उभी फूट पडली असून कुटुंबातील दोन व्यक्ती या निवडणुकीत उमेदवार म्हणून आमने-सामने आल्याचे बघायला मिळण्याची शक्यता आहे. विद्यमान खासदार सुप्रिया सुळे या महाविकास आघाडीकडून, तर राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या महायुतीकडून मैदानात उतरण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सुनेत्रा पवार यांचे जोरदार प्रयत्नही सुरू असून त्या लोकसभा मतदारसंघ पिंजून काढत आहेत. अशातच सुप्रिया सुळे यांनी काल त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंट आणि व्हॉट्सॲप स्टेटसवर शेअर केलेली एक पोस्ट चर्चेचा विषय ठरली. या पोस्टमधून सुप्रिया सुळे यांनी अप्रत्यक्षरित्या आपली उमेदवारी जाहीर केल्याचंच दिसत होतं. याबाबत चर्चा रंगताच सुळे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचं सांगितल्याने

महाविकास आघाडीच्या जागावाटप कसं असू शकतं?

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर निश्चित झाल्याची खात्रीलायक माहिती आहे. यासंदर्भात गुरुवारी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आघाडीतील जागावाटपाच्या फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे. अधिकृत घोषणा येत्या दोन दिवसांत होण्याची शक्यता आहे.

बारामतीतून मागील दोन टर्म खासदार राहिलेल्या सुप्रिया सुळे यांना नवीन चिन्हावर निवडणूक लढवावी लागणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह दिलं आहे. याच चिन्हासह फोटो शेअर करत सुप्रिया सुळे यांनी मतदारांना आवाहन केलं होतं. यातून तुम्ही तुमची उमेदवारी जाहीर केली आहे का, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर बोलताना खासदार सुळे यांनी म्हटलं की, ही माझ्या उमेदवारीची घोषणा नसून मी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे तिकीट मागण्यासाठी केलेली विनंती आहे, असं स्पष्टीकरण त्यांनी दिलं आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाविकास आघाडीचे जागावाटपाचे सूत्र २०-१८-१० असे ठरले आहे. यात प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीसाठी २ जागा सोडणार असल्याचे समजते. दिवसभर चाललेल्या या बैठकीला शरद पवार यांच्यासह ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरात उपस्थित होते.

वडगाव नगरपंचायतीचा विकास आराखडा प्रसिद्ध

मावळ : तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव नगरपंचायतीचा विकास आराखडा नागरिकांच्या अवलोकनासाठी सोमवारी (दि २६) प्रसिद्ध करण्यात आला. तो डेव्हलपमेंट प्लॅन नगरपंचायत कार्यालयात लावण्यात आला आहे. तो नगररचना विभागाचे वतीने यांनी सादर केला आहे.दरम्यान, या विकास आराखड्याबाबत नागरिकांच्या काही सूचना व हरकती असल्यास एक महिन्याच्या आत त्या दाखल कराव्यात, असे आवाहन नगर पंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. प्रवीण निकम यांनी केले आहे.

यामध्ये प्रामुख्याने मुख्य रस्ता ते महामार्गावर जोडणारे चार नवीन प्रशस्त रस्ते, गावठाण हद्दीतील रस्ते आय टी हब, भाजी मार्केट, नाट्यगृह, लायब्ररी आदी सोयीसुविधांसाठी ७७ ठिकाणी आरक्षणे टाकण्यात आली आहे.

नगर पंचायतीच्या स्थापनेनंतर प्रथमच शहराचा विकास आराखडा तयार झाल्याने नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता होती. त्यामुळे तो पाहण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, या विकास आराखड्याबाबत नागरिकांच्या काही सूचना व हरकती असल्यास एक महिन्याच्या आत त्या दाखल कराव्यात, असे आवाहन नगर पंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. प्रवीण निकम यांनी केले आहे.

मावळ तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या वडगाव शहराचा कारभार पूर्वी ग्रामपंचायत पाहत होती. फेब्रुवारी २०१८ मध्ये शासनाने ग्रामपंचायतीचे नगर पंचायतीत रूपांतर केले. १५ जुलै रोजी नगर पंचायतीची पहिली निवडणूक झाली होती. वडगाव शहराचा विकास आराखडा करण्यासंबंधीचा ठराव २९ जानेवारी २०२१ रोजी नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी मिळून केला होता. त्यानंतर मोनार्च एजन्सीने अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (इएलयू) तयार केला होता तर सहायक संचालक नगररचना विभागाच्या नगररचना अधिकाऱ्यांनी शहरातील विकास आराखड्याचा दुसरा टप्पा म्हणजे प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार केला. सोमवारी तो नागरिकांच्या अवलोकनासाठी तसेच त्यावर सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला.

शहराचे क्षेत्रफळ सुमारे १३ स्क्वेअर किलोमीटर एवढे असून त्यानुसार विकास आराखडा करताना आगामी वीस वर्षांच्या विकासाच्या दृष्टीने व सुनियोजित शहर करण्यासंदर्भात सोयीसुविधा करण्यात आल्या आहेत. मुख्य रस्ता (कोर्ट ते शिवाजी चौक) पंधरा मीटर तर गणपती मंदिरापासून ढोरेवाड्यात जाणारा रस्ता नऊ मीटरचा ठेवण्यात आला आहे. वडगाव ते सांगवी हा रस्ता १८ मीटर, वडगाव कातवी रस्ता २४ मीटर, खंडोबा मंदिर ते तळेगाव साखळी रस्ता १८ मीटर ठेवण्यात आला आहे. शहरातील सर्व भागांना जोडतील अशा नऊ ते अठरा मीटर रुंदीच्या नवीन रस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. रेल्वे स्टेशन ते विश्रामगृहाच्या बाजूने थेट हायवे, दत्त मंदिर ते हायवे, नगरपंचायत ते हायवे, शिवाजी चौक ते हायवे हे गावठाणातून हायवेला जोडणारे चार नवीन रस्ते, ब्राम्हणवाडी ते उर्से खिंड असा डोंगर पायथ्या लगत ३६ मीटरचा बायपास रोड, रिंगरोड, रेल्वे स्टेशनला समांतर दोन्ही बाजूला प्रत्येकी बारा मीटरचा सेवा रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. आरोग्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन करण्यासाठी एसटीपी प्लॅन्ट व शहरातील सर्व नाले संवर्धन व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने नाल्यांसाठी ग्रीन बेल्ट आदी सर्व प्रकारच्या आरक्षणाचा त्यात समावेश आहे.

श्री इडियटचा 'मिलिमीटर' दुष्यंत वाघ भरवणार शाळा : शिष्यवृत्ती १५ मार्चपासून प्रदर्शित !

आई-वडील जरी आपल्या मुलांवर संस्कार घडवत असले तरी, मुलांच्या एकंदरीत जडण-घडणीत, विचारांत सर्वाधिक मोठा वाटा असतो तो शिक्षकाचा. कारण मुलं जेवढा वेळ घरात नसतात त्याहुन अधिक काळ त्यांचा शाळेत आपल्या शिक्षकांच्या सहवासात जातो, त्यामुळे आपले आचार- विचार हे शिक्षकांवर अवलंबून आहेत, अशीच शिक्षक आणि विद्यार्थी यांची भावस्पर्शी गोष्ट लेखक दिग्दर्शक अखिल देसाई यांनी देखील आपल्या साज इंटरनेटमेंट बॅनर अंतर्गत शिष्यवृत्ती सिनेमातून शिष्यवृत्ती विषयाला एका वेगळ्या पद्धतीने मांडली आहे, आज या सिनेमाचे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. चित्रपटाचे सहनिर्माते सुरेश ढोरे, अनिल आणि सुनील बच्छाव आहेत.

पोस्टरमध्ये आपण शाळा,पटांगण आणि विद्यार्थी बघतो, यावरून लक्षात येते की शिष्यवृत्ती चित्रपटाची पार्श्वभूमी ही शाळा आणि शिक्षक-विद्यार्थी यांची आहे. चित्रपटात श्री इडियट चित्रपटाचा मिलिमीटर फेम दुष्यंत वाघ, निकिता पाटील, रुद्र ढोरे, कमलेश सावंत, अनिकेत केळकर, अंशुमन विचारे,उदय सबनीस यांच्या सिनेमात प्रमुख भूमिका आहेत.

शिक्षक विद्यार्थी सोबत आजच्या शिक्षण पध्दती आणि त्यांच्या अंमलबजवणीवर देखील दिग्दर्शक अखिल देसाई यांनी भाष्य केलं आहे. चित्रपटात एकूण ४ गाणी असून, चित्रपटाला भरत सिंग यांचे संगीत लाभले आहे.

सिनेमा हा समाजाचे प्रतिबिंब असल्याने आपल्या आसपास घडत असलेल्या घटना सिनेमात, सिनेमाचे स्वातंत्र्य घेत दर्शवणे ही एक मोठी तारेवरची कसरत अखिल देसाई यांच्यासाठी होती.

विद्यार्थ्यांनी मातृभाषेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक : प्रा. शैला क्षीरसागर

लोणंद : मातृभाषेतून घेतलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांना लवकर आकलन होत असते, त्यामुळे मातृभाषा येणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. शब्दात मोठी ताकद असते ती समजून घेणे गरजेचे आहे. मराठी विषयांमध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमामध्ये तसेच दूरदर्शन वरती अनेक मालिका सुरू आहेत. त्यामध्ये संवाद लेखन, पटकथा लेखन, गीत लेखन, कथालेखन, संवाद लेखन, अनुवाद, प्रकाशन, ब्लॉग लेखन, वेब सिरीज संवाद, बातमी लेखन, निवेदक, सूत्रसंचालक, परिसंवाद लेखन या क्षेत्रामध्ये मोठी संधी आहे. राज्यसेवा, पीएसआय, एसटीआय, असिस्टंट, सरळ सेवा, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक यासारख्या शासकीय सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या परीक्षेमध्ये मराठी विषयाला स्थान मोठे आहे. याची जाणीव विद्यार्थी दशेतील विद्यार्थ्यांना नाही ही गोष्ट दुर्दैवाची आहे. शब्दही मोठे भांडवल आहे त्याचा वापर करून जीवन यशस्वी करता येते.

प्रवचन व कीर्तन या कलांमध्ये सामाजिक व अध्यात्मिक ज्ञानाबरोबर मराठी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मुधोजी महाविद्यालय फलटण येथील प्रा शैला क्षीरसागर यांनी केले.

लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या सामंजस्य करार अंतर्गत आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ' मराठी साहित्य आणि मराठी विषयातील संधी ' या विषयावर प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला विभागाचे उपप्राचार्य प्रा. भिमराव काकडे होते. यावेळी व्यासपीठावरती मराठी विभाग प्रमुख प्रा सुभाष कदम, डॉ कोकिळा चांगण, प्रा. सतीश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला मान्यवरांचे हस्ते अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा. सुभाष कदम यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयातील प्रा. जालिंदर वाघ, प्रा. छाया सकटे, प्रा. लोखंडे, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कोकिळा चांगण यांनी केले व मान्यवरांचे आभार प्रा.सतीश कांबळे यांनी मानले.

गीतरामायणाच्या सादरीकरणाने सातारकर रसिक मंत्रमुग्ध

मसाप, शाहूपुरी, सातारा नगरपालिका आयोजित मराठी भाषा पंधरवड्याचा प्रारंभ

सातारा : मराठी भावगीताचे अत्युच्च शिखर म्हणजे अर्थातच गीतरामायण. मराठी माणसांच्या मनात जेथे पवित्र व सुंदर गोष्टी वास करतात, तेथे गीतरामायणाने स्थान मिळवले आहे. गदिमा आणि बाबूजींच्या रुपाने मराठीजणांना जणू श्रीरामांचा आशीर्वाद मिळाला आहे, अशा या गीतरामायणांच्या सादरीकरणाने सातारकर रसिक मंत्रमुग्ध झाले. कलाकरांनी सादर केलेल्या गीताबरोबरच गदिमांचे सुपुत्र आनंद माडगूळकर यांनी सांगितलेल्या गदिमांच्या आठवणी, गोष्टी, किस्से, त्याचबरोबर सातारकर रसिकांनी दिलेला वन्समोअर आणि कोरस यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. निमित्त होते मसाप, पुणे शाहुपुरी शाखा आणि सातारा नगरपालिका आयोजित पहिला मराठी भाषा पंधरवड्याच्या १३ वे वर्षाचे उद्घाटन.

आधुनिक वाल्मिकी असा आदरयुक्त उल्लेख ज्यांचा केला जातो ते लेखक, ज्येष्ठ कवी गदिमा यांच्या लेखणीतून उमटलेले गीतरामायण शाहूकलामंदिर येथे गायक अभिजित पंचभाई, हेमंत वाळुंजकर, श्रुती देवस्थळी, मीनल पोंक्षे, हार्मोनियम प्रसन्न बाम, तबला अभिजित जायदे, ताल वाद्य राजेंद्र साळुंखे यांनी सादर केले तर निवेदन होत स्नेहल दामले यांचे. गीतरामायण ऐकणे म्हणजे जणू एक श्रीराम चरित्राचे पारायणच. अशा या पारायणाची सुरुवात आनंद माडगूळकर यांनी गोंदवलेकर महाराजांच्या स्तवनाने केली. वेळेची मर्यादा लक्षात घेता उपस्थित कलाकारांनी गीतरामायणातील महत्वाचे प्रसंग सादर भावोत्कट पध्दतीने सादर केल्याने शाहू कलामंदिर जणू अयोध्या नगरीच अवतरल्याचा भास निर्माण झाला होता. 'कुश लव रामायण गाती', 'अयोध्या मनोनिर्मिती नगरी', 'राम जन्मला ग सखे राम जन्मला', 'विश्वामित्र मागती', 'रामा चरण तुझे लागले आज मी शापमुक्त झाले', 'सीता स्वयंवर', 'आकाशी जसे जडले नाते',अशी एकाहून एक सरस गीते सादर केल्याने सातारकर रसिकांनी त्याला भरभरुन प्रतिसाद दिला. टाळ्याचा कडकडाट, वन्स मोअर आणि काही ठिकाणी सातारकरांनी दिलेला कोरस यामुळे शाहू कलामंदिर भारावून गेले होते. त्याच जोडीला गदिमांचे सुपुत्र आनंद माडगूळकर यांनी सांगितलेले गदिमांचे किस्से, आठवणी, गोष्टी यामुळे कार्यक्रम आणखीच बहारदार झाला.

प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन मराठी भाषा पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मसाप पुणे प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, आनंद माडूगळकर, मसाप पुणे शाहुपुरी शाखेचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, पत्रकार दीपक शिंदे आणि मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर संयोजकांच्यावतीने मान्यवरांचा आणि कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मसाप पुणेचे प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार म्हणाल्या, मसाप, शाहुपुरी शाखेने जो जो उपक्रम केला तो यशस्वी करुन दाखवला आहे. त्यांचे सगळेच उपक्रम स्तुत्य असतात. साहित्यिक बंधुभाव निर्माण करण्याचे काम साहित्य परिषद करते.

व्यवहार, शैक्षणिक आणि कलेची मराठी भाषा वेगली आहे. जोपर्यंत कला जिवंत आहे तोपर्यंत माय मराठी तरेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पत्रकर दीपक शिंदे यांनी मराठी भाषेचे महत्व

मराठी भाषा पंधवड्यातील दुसरा कार्यक्रम शनिवार दि.२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता नगरवाचनालयाच्या पाठक हॉल येथे होणार आहे. अलिबाग येथील सुप्रिया राज यांचा काश्मिरीयत हा कार्यक्रम होणार आहे. त्यात काश्मिरच्या अंतर्गत भागात स्वत: एकटे फिरताना आलेले अनुभव त्या कथन करणार आहेत.

सांगत वर्षातून केवळ महाराष्ट्र दिन, मराठी भाषा दिन, वाचणा प्रेरणा दिन या दिवशी मराठी भाषेचे स्मरण न करता दैनंदिन मराठी वापरासाठी आग्रह धरला पाहिजे. त्यासाठी शालेय व्यवस्था दुरुस्त करणे, नियोजन करणे आणि आराखडा तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रास्तविकात मसाप पुणे शाहुपुरी शाखेचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी मराठी भाषा पंधवड्यात गेल्या १३ वर्षांपासून सातत्य ठेवलेली मसाप पुणे शाहुपुरी शाखा एकमेव आहे. आमच्या सगळ्यांना उपक्रमांना मसाप पुणेचे पाठबळ आणि सहकार्य मिळत असते. शाखेच्या बा.सी.मर्ढे करांच्या घराचे नूतनीकरण आणि स्मारकात रुपांतर या उपक्रमाचे महाराष्ट्रातून कौतुक, अभिनंदन होत असून पदाधिकारी आणि सातारकरांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार सावंत यांनी केले तर आभार ड. चंद्रकांत बेबले यांनी मानले. कार्यक्रमास किशोर बेडकिहाळ, डॉ. उमेश करंबेळकर, शिरीष चिटणीस, डॉ. राजेंद्र माने, अजित साळुंखे, प्रा. श्रीधर साळुंखे, ड. बाळासाहेब बाबर, प्रवीण पाटील, वजीर नदाफ, तुषार महामूलकर, सचिन सावंत, संजय माने, मसाप शाहुपुरी शाखेचे सदस्य, पदाधिकारी आणि सातारकर रसिक उपस्थित होते.

लोणावळ्यात अजित पवार गटाला मोठा धक्का

१२५ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिले राजीनामे

वडगाव मावळ : मावळ तालुक्यातील लोणावळा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांच्या गटातील १२५ पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते यांनी आज पक्षीय सदस्यत्व व पदांचे राजीनामे दिले आहेत याबाबतचे लेखी पत्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर यांच्याकडे पाठवले असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आली.

-ज्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाला साथ दिली. मागील २५ वर्ष मावळ तालुक्यात सत्ता नसताना देखील जय पराजय पचवत पक्ष नेतृत्वाच्या सोबत राहिले.त्या जुन्या जाणत्या व प्रामाणिक कार्यकर्त्यांना पक्ष संघटनेमध्ये विश्वासात न घेता डावलले जात असल्याची नाराजी व्यक्त केली

एकाच वेळी सव्वाशे पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याने लोणावळा शहर राष्ट्रवादीमध्ये उभी फूट पडली असून सर्वत्र या नाराजीची व राजीनामा सत्राची चर्चा सुरू आहे.

अजित दादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाजूला होत वेगळा गट स्थापन केल्यापासून लोणावळा शहर व मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये काही खदखद सुरू होती. मात्र कोणीही उघडपणे पुढे येऊन याबाबत मत व्यक्त करत नव्हते. मावळ तालुक्याचे आमदार सुनील शेळके हे अजितदादा पवार यांच्यासोबत असल्याने मावळात कोणीही उघडपणे शरद पवार गटाला पाठिंबा देत नव्हते.

मात्र काहीतरी नाराजी असल्याचे चित्र अनेक कार्यक्रमांमधून दिसून येत होते. आता मात्र या सर्व गोष्टींचा स्फोट झाला असून ती खदखद आजच्या पत्रकार परिषदेच्या निमित्ताने पुढे आली आहे.

याला निमित्त ठरले लोणावळा शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष पद. लोणावळा शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष विनोद होगले हे संघटनेमध्ये चांगले काम करत असताना व संघटना वाढीसाठी विविध लोकोपयोगी व सामाजिक उपक्रम राबवत असताना अचानक तडकाफडकी त्यांच्या जागी नवीन अध्यक्ष तालुक्याच्या आढावा बैठकीमध्ये नियुक्त करण्यात आला. याबाबत होगले यांना कोणतीही कल्पना देण्यात आली नाही, किंवा लोणावळा शहरातील जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांशी चर्चा देखील करण्यात आली नाही.

अजित पवार यांच्यापासून जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष या सर्वांना लोणावळा शहरातील व मावळ तालुक्यातील खदखद माहीत असताना व वारंवार त्यांच्या कानावर सर्व विषय घालण्यात आलेले असताना देखील पक्ष नेतृत्व दखल घेत नसल्याने अखेर नाईलाजास्तव आम्हाला हे पाऊल उचलावे लागले. व एकदा पुढे टाकलेले पाऊल आता मागे घेतले जाणार नाही अशा स्पष्ट शब्दांमध्ये या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला आहे.

हे पाऊल उचलत असताना आम्ही लोणावळा शहरांमधील इतरही जुन्या जनता नेत्यांशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे. ते देखील आमच्या सोबत असून पुढील काळामध्ये अनेक गोष्टींचा उलगडा होईल, लवकरच सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घोषित करू असा सूचना वजा इशारा या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांतिक सदस्य व पक्ष स्थापनेपासून पक्ष सोबत असणारे जेष्ठ नेते बाळासाहेब पायगुडे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे लोणावळा शहर माजी अध्यक्ष विनोद होगले, मावळ तालुका चित्रपट व सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष संतोष कचरे, अनुसूचित जाती जमाती सेलचे मावळ तालुका अध्यक्ष दत्तात्रय गोसावी, वलवण, खंडाळा, गावठाण, इंदिरानगर, भांगरवाडी, नांगरगाव, ठोंबरेवाडी, हनुमान टेकडी, हुडको, जुना खंडाळा भागातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

समाजात कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम केले जाईल : पी आय घनश्याम सोनवणे

वडूज पोलीस ठाण्याचा पोलीस निरिक्षक घनश्याम सोनवणे यांच्याकडे पदभार

मनसेच्या वतीने स्वागत

वडूज : समाजात तेढ निर्माण करून , चुकीच काम करणाऱ्यावर आपण स्वतः लक्ष ठेऊन आहे तर समाजात कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम केले जाईल असे मत वडूज पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरिक्षक घनश्याम सोनवणे यांनी व्यक्त केले आहे. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोजगार विभागाचे राज्य चिटणीस सूरज लोहार व मित्र परिवारांच्या वतीने त्यांचा सत्कार घेण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सचिन खुडे, रोहित लोहार, विशाल गोडसे, तुषार लोहार, मन्सूर खोत्, आदिनाथ दुबळे, हिम्मत पाटोळे, गणेश खुडे, उस्मान सय्यद, पवन नागावकर, मंगेश पवार, संतोष देशमुख आदिसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री सोनवणे म्हणाले समाजात कोणत्याही जातीची भावना दुखावेल अशा पोस्ट करू नयेत. सोशल मीडियाचा वापर करताना चांगल्या गोष्टींसाठी करावा. शहरातील वाहतूकिच्या समस्या, व पोलिसांच्या माध्यमातून विविध उपाय योजना करण्याचा मानस असल्याचे ही ते म्हणाले.

यावेळी सूरज लोहार म्हणाले सध्या खटाव तालुक्यात निर्भया पथक सतर्क करण्याची गरज आहे. तालुक्यातील शाळा , विद्यालय, महाविद्यालय याठिकांनी निर्भया पथकाची गस्त घालण्याची गरज आहे. तसेच शहरात काही ठिकाणी सुसाट वेगाने दुचाकी पळवण्याचे प्रकार घडतात अशा प्रवृथीना आळा घालण्यात यावा.

गेल्या काही दिवसापासून तत्कालीन पोलीस अधिकारी मालोजी राव देशमुख यांनी ही शहरात चांगल्या प्रकारे काम केले आहे. त्याचं प्रमाणे आपणाकडून हिच अपेक्षा वडूज करांची असल्याचे मत श्री लोहार यांनी व्यक्त केले.

खोपोलीचा ठग दीड महिना मोकाट

मुंबईतल्या भंगार व्यावसायिकाला २० लाखांचा गंडा

मुंबई : लाखो रुपयांचा स्टीलचा भंगार माल स्वस्तात विकण्याची बतावणी करून साकीनाका येथील एका भंगार व्यावसायिकाला खोपोली हल बुद्रुक म्हाडा कॉलनीमधील अमीर मोहिद्दीन खान या इसमाने तब्बल २० लाख रुपयांचा गंडा घातला आहे. भंगार माल न देता त्याने ती सारी रक्कम हडपली आहे. त्याने विश्वासघाताने फसवणूक आणि लुबाडणूक केलेल्या भंगार व्यावसायिकाचे नाव हमिदुल्लाह चौधरी असे आहे. त्यांनी या प्रकरणात साकीनाका पोलीस ठाण्यात १९ जानेवारी २०२४ रोजी रीतसर लेखी तक्रार केलेली आहे. त्यावेळी फिर्यादी चौधरी आणि संविधान समर्थक दलाचे नेते शिवाजीराव भोसले यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गबाजी चिमटे यांची भेट घेवून तक्रार अर्ज त्यांना सादर केला होता. या गुन्ह्यात अमीर खान हा आयपीसीच्या कलम ४०६,४२०,३४ अन्वये फौजदारी कारवाईला पात्र आहे. तो सराईत ठग असल्याची माहिती खोपोलीच्या म्हाडा कॉलनी परिसरातून मिळते, असे फिर्यादी हमीदुल्लाह चौधरी यांचे म्हणणे आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमटे यांनी तत्परतेने हे प्रकरण पुढील कार्यवाहीचे निर्देश देऊन एका सहाय्यक पोलीस निरीक्षकाकडे सोपवलेही होते. त्याला आता दीड महिना उलटला आहे; पण संबंधित तपास अधिकाऱ्याने फिर्यादीचा जबाब नोंदवण्यापलीकडे कुठलीही हालचाल अद्याप केलेली नाही, अशी माहिती भोसले यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

ऑनलाईन पेमेंटचे पुरावे उपलब्ध

आरोपी अमीर खान याने फिर्यादी भंगार व्यावसायिक हमिदुल्लाह चौधरी यांना खोपोली येथे बोलावून घेवून दाखवलेला भंगार माल २० लाख रुपयांत विकण्याचे मान्य केले होते. त्यानंतर चौधरी यांनी तेवढी रक्कम ऑगस्ट २०२३ मध्ये अमीर मोहिद्दिन खान याच्या खोपोलीतील आक्सिस बँकेच्या खात्यात (नंबर: ९२२०२००१७५१२१३३) जमा केली होती. त्याचे ऑन लाईन पेमेंटचे पुरावे चौधरी यांनी साकीनाका पोलिसांना तक्रारीसोबत जानेवारीतच सादर केलेले आहेत.

तपास अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात आरोपी अमीर खान याच्याशी साकीनाका पोलिसांनी फोनवरून संपर्क साधला असता फसवणुकीचा गुन्हा केल्याचे त्याने कबूल केले. इतकेच नव्हे तर, ' चौधरी यांची रक्कम मला बुडवायची नाही,'असे सांगत पोलीस ठाण्यात हजर होण्याचेसुद्धा त्याने मान्य केले होते. मात्र अमीर खान हा अद्याप पोलिसांकडे आला नाही. तरीही तपास अधिकारी असलेल्या सहायक पोलीस निरीक्षकाने त्याच्यावर पुढील कारवाई करण्यात स्वारस्य दाखवले नाही, असे सांगून भोसले म्हणाले की, हा मामला संशयास्पद बनला आहे.

दहावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षेला जाण्यासाठी आमदार शेळके यांच्याकडुन मोफत वाहतुक सेवा

वडगाव मावळ : आमदार सुनिल शेळके यांच्या वतीने मावळ विधानसभेतील विशेषतः ग्रामीण भागातील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घर ते परीक्षा केंद्र अशी मोफत वाहतुक सेवा सुरु करण्यात आली आहे.या उपक्रमाचे सलग सातवे वर्ष असून दरवर्षी या उपक्रमाचा हजारो विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता दहावीची बोर्ड परिक्षा शुक्रवारपासून (दि.१) सुरु झाली.मावळ विधानसभेतील तेरा परीक्षा केंद्रावर यंदा ६६६८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी असलेल्या परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचणे आवश्यक असते.परंतु इतर वाहतूक व्यवस्था वेळेवर उपलब्ध होण्याची शाश्वती नसते.त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते ही समस्या ओळखून मावळचे आमदार सुनिल शेळके यांच्या पुढाकारातून सन २०१६-१७ पासून तालुक्यातील विविध भागातून घर ते परीक्षा केंद्र अशी मोफत वाहतुक सेवा सुरु करण्यात आली आहे.

आंदर मावळ, पवन मावळ, नाणे मावळ भागातील कामशेत, माळेगाव, तुंग,कुसवली, वहाणगाव, वारु, वडेश्वर, दिवड, पाथरगाव, सांगिसे, टाकवे, पवनानगर, कान्हे, कार्ला, शिवणे, बौर, ओझर्डे, पाचाणे, कुरवंडे आदी गावांमधून विद्यार्थ्यांना परिक्षा केंद्रावर जाण्या-येण्यासाठी सुमारे दिडशे गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

भवितव्याच्या दृष्टीने शालेय जीवनातील महत्त्वपूर्ण असलेली दहावीची परिक्षा विद्यार्थी देत आहेत.विद्यार्थी इतर वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहिल्यास परिक्षेला उशीर होऊन शैक्षणिक नुकसान होण्याची संभावना असते.घरापासुन परिक्षा केंद्रावर वेळेत पोहोचले पाहिजे.तसेच परिक्षेच्या काळात मुलांना अभ्यासासाठी अधिक वेळ देखील मिळाला पाहिजे.अशा तणावमुक्त अभ्यासासाठी व मुलांच्या उज्वल यशासाठी आमदार सुनिल शेळके यांनी मोलाचा हातभार लावल्याबद्दल पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ही आहेत परिक्षा केंद्रे :-

तळेगाव दाभाडे येथील रामभाऊ परुळेकर केंद्रावर १०६२ विद्यार्थी, परांजपे विद्या मंदिर ७९२, श्री शिवाजी विद्यालय देहूरोड २८९ विद्यार्थी, सेंट ज्युड हायस्कूल ४६९,न्यु इंग्लिश स्कूल वडगाव ७७६,पवना विद्यामंदिर ४४१,पंडित नेहरु माध्य. विद्यालय कामशेत ६०४, न्यु इंग्लिश स्कूल चांदखेड ३२८, डॉ.बी.एन.पुरंदरे विद्यालय लोणावळा ३५२, ड.बापुसाहेब भोंडे विद्यालय लोणावळा ६८४, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल ३६६, संपर्क ग्रामीण विद्या विकास केंद्र ७५ अशा एकूण तेरा परिक्षा केंद्रावर ६६६८ विद्यार्थी परिक्षा देणार आहेत.

साखरवाडी केंद्रावर दहावीच्या बोर्डाची परीक्षा शांततेत

साखरवाडी : साखरवाडी येथील सरदार वल्लभभाई हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या केंद्र क्रमांक १००५ परीक्षा केंद्रावर दहावीच्या बोर्डाची परीक्षा चालू असून येथे एकूण ४२० विद्यार्थी बोर्डाची परीक्षा देण्यासाठी बसले आहेत साखरवाडी विद्यालय साखरवाडी या ठिकाणी यातील काही विद्यार्थी बसलेले असून साखरवाडी, सुरवडी, खराडेवाडी, बीजे इंग्लिश स्कूल, जिंती, फडतरवाडी ,होळ ,मुरूम ,रावडी येथील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी साखरवाडी केंद्रावर दहावीची परीक्षा देत आहेत.

केंद्र संचालक प्रा. शिवाजी काळे उपकेंद्र संचालक अण्णा ननावरे संचालक उर्मिला जगदाळे परीरक्षक रामचंद्र बागल यांनी परीक्षा व्यवस्था व यंत्रणा व्यवस्थित पार पडण्यासाठी परिश्रम घेतले असल्याचे केंद्र संचालक लक्ष्मण नरुटे यांनी यावेळी सांगितले यावेळी रवींद्र टिळेकर सर हुंबरे सर बाळू नवले सर रामचंद्र बागल उपस्थित होते साखरवाडी पोलीस दूर क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचेही परीक्षा केंद्रावर परीक्षा शांततेत पार पाडण्यासाठी योग्य सहकार्य लाभले.

प्री-वेडिंग शूटिंगमुळे क्षेत्रमाहूलीचा निसर्गरम्य परिसर गजबजला

क्षेत्र माऊली : प्री वेडिंग शूटिंग मुळे लग्नापूर्वीच महिनाभर अगोदर वधू-वरांना मोकळीक दिली जाते. सातारा शहरा नजीक असलेल्या क्षेत्र माहूली येथील कृष्णा व कोयना नदीच्या निसर्गरम्य परिसरात संगम नजीक सध्या शूटिंगसाठी अनेक हौशी व व्यावसायिक फोटोग्राफर तसेच लग्न ठरलेले वधू वर शूटिंग करण्यात मग्न असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून क्षेत्रमाहू ली येथील काहींनी सुख- सुविधा निर्माण करून पर्यटनाला चालना दिलेली आहे.

पूर्वी लग्नाच्या गाठी या स्वर्गात बांधल्या जातात अशी आख्यायिका सांगितली जाते .पण अलीकडच्या काळामध्ये लग्नाचा ट्रेड बदलला आहे. आता लग्न घटिका जवळ आली तरी अनेक हौस व इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नवं वधू वर व त्यांचा मित्रपरिवार नातेवाईक लगीन घाई करत असतात. आता तर प्री-वेडिंग वेडिंग शूटिंग मुळे लग्नापूर्वीच महिनाभर अगोदर वधू-वरांना एकमेकांच्या आवडीनिवडी व राहणीमानाचा अनुभव घ्यावा लागतो.

सातारा शहरा नजीक असलेल्या क्षेत्र माहूली येथील कृष्ण कोयनेच्या संगम नजीक व प्राचीन शिल्पकलेने नटलेल्या अनेक मंदिरामध्ये सध्या प्री-वेडिंग शूटिंगसाठी अनेक हौशी फोटोग्राफर व व्यावसायिक तळ ठोकून आहेत.तसेच लग्न ठरलेले वधू वर शूटिंग करण्यात मग्न असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून अनेक सुख सुविधा निर्माण करून पर्यटनावर चालना दिलेली आहे.

हल्ली लग्नामध्ये प्री-वेडिंग शूट ला नवं वधू-वरांच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे. नववधू वरांना प्री-वेडिंग शूटच वेड लागलेल आहे. लग्नसोहळा आणि त्या अगोदरचे नववधूवरांचे सहवासाचे क्षण कॅमेऱ्यात टिपणे , व्हिडिओ करणे, रिल्स करणे, व्हिडिओ करून युट्युब वर, इंस्टावर टाकणे. याला विशेष महत्त्व आले आहे. सातारा येथील व्यावसायिक फोटोग्राफर निनाद जगताप व पियुष यांनी सांगितले की सध्या प्रत्येक गोष्टींमध्ये हौस निर्माण झालेले आहे. फॅशनच्या युगामध्ये दररोज नाविन्यपूर्ण प्रयोग करावे लागतात. विशेषता शहरी भागात राहणाऱ्या अनेक नववधू वर हे ग्रामीण भागाशी निगडित असलेल्या अनेक गोष्टींसोबत फोटोसेशन करत असतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने या फोटोमध्ये ग्रामीण भागातील मातीचा सुगंध ही दरवळतो. चुलीवरील स्वयंपाक, बैलगाडीतील फेरफटका व शेतातील कामे अशा शूटिंगला प्राधान्य दिले जाते. जात्यावरील दळण पारंपारिक वेशभूषा करून मराठी चित्रपटासारखे दृश्य दाखवले जातात.

लग्नाअगोदरच्या नववधू-वरांच्या आठवणीचे फोटो, व्हिडिओ करून त्या आठवणी डोळ्यात साठवून मोठ्या स्क्रीनवर लग्न समारंभात दाखविणे याला महत्व आले आहे. लग्ना अगोदरच्या आठवणी कॅमेऱ्यात बंदिस्त करून व्हिडिओ स्वरूपात त्याची निर्मिती करणे त्याला प्री वेडिंग शूट म्हटले जाते. अनेकदा रिटेक करावे लागतात काही वेळेला तर या प्री-वेडिंग साठी एक आठवडा शूट करावे लागते आणि तशा पद्धतीने सूचनाही केल्या जातात.

अलीकडच्या काळात लग्न म्हणजे एक नुसता धार्मिक विधी नव्हे. तो आनंदाचा, उत्साहाचा, मजेचा एक क्षण मानला जातो. ज्यावेळेस नववधू वराच्या विवाह सोहळ्याची तारीख ठरविली जाते त्या अगोदर नववधू वर प्री-वेडिंग शूट करतात. सुशिक्षित वर्गामध्ये याला अति महत्व आलेला आहे. परंतु ग्रामीण भागातही आता शिवारात, धरण , तलाव ,नदी, विहीर व धार्मिक स्थळ या ठिकाणी प्री-वेडिंग अत्यंत आनंदाने केले जाते

काहीजण लाखो रुपयेही खर्च करतात. क्षेत्र माहूली, लिंब नजीक बारा मोटाची विहीर, मेरुलिंग ,गोवा , कास पठार, कोयना धरण परिसर, कोकण, महाबळेश्वर, काश्मीर मध्ये जाऊन शूट करतात . काही हॉटेल व्यवसायिकांनी यासाठी हॉटेल व वस्तूंचे दर हे ठरवले आहेत त्यानुसार पोषक , दागिने व आवश्यक असणाऱ्या बाबी उपलब्ध केल्या जातात. प्री-वेडिंग शूटच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. प्री-वेडिंग शूट मुळे फोटोग्राफर्स व्हिडिओग्राफर्स यांना मोठी मागणी वाढली आहे. त्यामध्ये आता पूर्ण व्यावसयिकता आलेली आहे अगदी पोशाख बदलण्याइतपत छोटासा रूम सुद्धा रेडीमेड तयार करून मिळतो.

शूट केल्यानंतर त्याचे हिंदी, मराठी गाण्यासहीत व्हिडिओ पाच,दहा मिनिटाच्या कालावधीत गाणे असलेले स्क्रीनवर सातत्याने विवाह सोहळ्यात दाखवले जातात. त्यामुळे एलईडी स्क्रीनलाही महत्त्व आले आहे.

ग्लोबल आणि श्रीमंती जमान्यात हाच आपला समृद्धीचा आणि आनंदाचा पासवर्ड असणार आहे तो विसरुन कसा चालेल?

जावळी तालुक्याचा विकास, पाटण तालुका भकास

पाटण : तालुक्यात पर्यटनासह रोजगार वाढीस मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. आज पाटण तालुका पर्यटनाच्या बाबतीत भकास होत असल्याचे समोर येत आहे. तालुक्याच्या शेजारील जावली, महाबळेश्वर तालुक्याला सुमारे ४०० कोटींचे पॅकेज मुख्यमंत्री देत असताना पाटण तालुक्यातील पर्यटनाच्या वाट्याला केवळ पाच टक्के निधी उपलब्ध होत आहे, हे दुर्दैव आहे. पाटणचा पर्यटन विकास मुख्यमंत्र्यांनी जावळीला पळविला, अशी खंत पाटण तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शंकरराव मोहिते यांनी व्यक्त केली.

पाटण तालुका टुरिझम डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश महिंदकर यांच्या अध्यक्षतेखाली पाटण येथे बैठक पार पडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष विकास पाटील, सचिव सुनील शिंदे, धैर्यशील पाटणकर, पत्रकार विद्या म्हासुर्णेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोहिते म्हणाले, गेल्या दहा वर्षात पर्यटन विकासाच्यादृष्टीने एकही मोठा प्रकल्प पाटण तालुक्यात आला नाही. जे होते ते बंद झाले. नवीन महाबळेश्वरच्या प्रस्तावित आराखड्यातील सर्व प्रकल्प जावली, महाबळेश्वरला पळविले जात आहेत. पाटण तालुक्यातील कोयनेचे बोटिंग बंद करून जावली तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्यासाठी ४५ कोटी रुपये शासनाने मंजूर केले आहेत. जागतिक दर्जाचे पर्यटन विकसित करण्यासाठी जावलीतील कोयना जलाशयावर ३५० कोटी रुपयांपेक्षा ज्यादाचा निधी खर्च करून अहिरे येथे पुलाची निर्मिती सुरू आहे. जावली तालुक्यात स्कूबा डायव्हिंग, बनाना राईड, जेट स्की, हाऊस बोट, बोट क्लब यासह पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येत आहेत. मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत महाबळेश्वर पर्यटन विकासासाठी पुन्हा ३६० कोटी रुपये निधी मंजूर केला गेला आहे. या माध्यमातून पाटण तालुक्यातील पर्यटन विकासाच्या नावाने तोंडाला केवळ पाने पुसण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

सचिव सुनील शिंदे यांनी प्रास्ताविकात संस्थेची ध्येयधोरणे सांगितली. संस्थेचे उपाध्यक्ष विकास पाटील यांनी आभार मानले. बैठकीस राजू माळी, प्रकाश पाटील, विजय कदम, सतीश पवार, जगन्नाथ सपकाळ, लक्ष्मण चव्हाण, प्रदीपकुमार घारे, संग्राम जमदाडे, समीर कदम, अविनाश शेडगे, तानाजी लोहार, महेंद्रनाथ भारती, अमरसिंह जाधवराव, प्रवीण उर्फ विकास पाटील, पत्रकार राजेंद्र पवार, संजय कांबळे, नीलेश साळुंखे, सुरेश संकपाळ आदी उपस्थित होते.

असलेल्या पक्षांनी आपली ताकद ओळखून जागा मागाव्या : प्रकाश आंबेडकर

मुंबई: फुटलेल्या पक्षांनी आपली ताकद ओळखून जागांची मागणी करावी, अशा शब्दात वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट यांना जागा वाटपाबाबत सुनावले आहे.

कोंबडी शिजवायची आम्ही आणि आम्हाला फक्त मुंडक मिळालं, अख्खी कोंबडी दुसरेच कोणीतरी घेऊन गेले, असे होता कामा नये. आम्ही तसे होऊ देणार नाही. आपण शेवटपर्यंत वाट पाहू. मिळून मिसळून सन्मानाने कोंबडी खाऊ, असे आपण आपल्या पक्षाच्या लोकांना सांगितले आहे, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले. वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडी मध्ये समाविष्ट झालेली आहे. मात्र, जागा वाटपाबाबत आघाडीतील घटक पक्षांशी त्यांची बोलणी झालेली नाहीत.